# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**F**

SPANDAN Career Institute
The way of success...
SINCE 2008

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **GS2022**

**Total Que. : 100**
**Marks : 100**
**Time : 60 min**


**Mob. No. 9923262977**
**Date :13/02/2022**

**संयुक्त (पूर्व) सराव परिक्षा - 2022**
**विषय : — सामान्य अध्ययन [006]**
**पेपर क्र. (६)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू

२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.




३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुर्थांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

१. एका सांकेतिक भाषेत
$#* म्हणजे shirt is clean
D# म्हणजे Clean and neat
@ ? म्हणजे Neat boy तर
'and' या शब्दासाठी खालील सांकेतांक कोणता ?
१) # २) D ३) @ ४) अपुरी माहिती

२. घडयाळात प्रत्येक ३० मिनिटाला एक व प्रत्येक तासाला जितके वाजले असतील तितके टोले पडतात तर १२ तासात एकूण किती टोले पडतील ?
१) ९० २) ४५ ३) ६० ४) ७५

३. एक घडयाळ जमीनीवर पडले व तुटले. त्याची वेळ ७.३० अशी दाखवत होते. ज्यानुसार तास काटा ईशान्य दिशा दाखवत होता तर मिनिट काटा कोणती दिशा दाखवेल ?
१) पूर्व २) पश्चिम ३) उत्तर ४) वायव्य

४. A आणि B हे एका वर्तुळाकार मैदानाभोवती फेरी मारतात. A व B अनुक्रमे प्रति तासाला अनुक्रमे २ व ३ फेऱ्या मारतात. जर फेऱ्या मारण्यास त्यांनी ८ वाजता सुरुवात एकमेकांच्या विरुध्द दिशेने केली तर ९.३० वाजेपर्यंत ते किती वेळा एकमेकांना पार (Cross) करतील ?
१) ५ २) ६ ३) ७ ४) ८

५. जर MEANDER साठी सांकेतांक ४५१५४५९ असेल तर MATHEMATICS साठी काय सांकेतांक (code) असेल?
१) ६७२५०६२३०७६ २) ४१२८५४१२९३१ ३) ४५०३८४०१८५४ ४) यापैकी नाही

६. जर orange म्हणजे lemon, lemon म्हणजे flower, flower म्हणजे fish, fish म्हणजे Tail, Tail म्हणजे pen तर गुलाब (rose) काय आहे ?
१) pen २) lemon ३) flower ४) fish

७. योग्य अनुमान ओळखा.
विधान – (अ) काही कुत्रे वटवाघुळ आहेत
(ब) काही वटवाघुळ मांजरे आहेत
अनुमान – (अ) काही कुत्रे मांजर आहेत
(ब) काही मांजरे कुत्रे आहेत
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही बरोबर ४) दोन्ही चूक

८. कारण व परिणामाबाबत योग्य पर्याय निवडा
अ) शनिवार – रविवारी अनेक लोकांनी धार्मिक स्थळांना भेट दिली
ब) इतर दिवशी खूप लोक धार्मिक स्थळांना भेट देतात
१) अ हे कारण असून ब हे परिणाम आहे २) ब हे कारण असून अ हे परिणाम आहे
३) दोन्ही वाक्यांचा एकमेकांशी संबंध नाही ४) वरीलपैकी नाही

९. खालील अक्षरांच्या क्रमवारीसाठी योग्य पर्याय निवडा
$B_2CD$,----------,$BCD_4$, $B_5CD$, $BC_6D$
१) $B_2C_2D$ २) $BC_3D$ ३) $B_2C_3D$ ४) $BCD_7$

१०. तीन संख्यांची सरासरी ८७ आहे. पहिला क्रमांक दुसऱ्यापेक्षा चारपट आहे व तिसऱ्यापेक्षा पाचपट आहे. तर सर्वात मोठा व सर्वात लहान क्रमांकातील फरक सांगा.
१) ९९ २) १३२ ३) १४४ ४)१६९

११. विधाने
अ) काही दंत चिकित्सक आशियाई आहे
ब) काही आशियाई शिशू चिकित्सक नाहीत
पुढे दिलेला कोणता पर्याय वरील विधानांस लागू होत नाही ?
१) काही लोक शिशू चिकित्सक नाहीत
२) कोणताही शिशू चिकित्सक आशियाई नाहीत
३) काही आशियाई दंत चिकित्सक आहेत
४) असे दंत चिकिस्तक असू शकतात जे आशियाई नाहीत

१२. टिव्हीच्या माध्यमातून शिक्षण घेणे हे विद्यार्थ्यांना शिक्षकाविना शिकण्यासाठी उपयुक्त ठरत आहे
गृहीतक :
अ) विद्यार्थ्यांना शिक्षकाविना शिकायचे आहे
ब) शिक्षक शिकवण्यासाठी अकार्यक्षम आहेत
१) फक्त अ अंतर्निहीत आहे २) फक्त ब अंतर्निहीत आहे
३) अ व ब अंतर्निहीत आहे ४) यातील एकही अंतर्निहीत नाही

www.spandancareers.org

१३. एका वर्गातील ४०% मुले गणितात उत्तीर्ण झाली असून ५०% मुले इंग्रजीत उत्तीर्ण झाली आहेत. ५% मुले या दोन्ही विषयात अनुत्तीर्ण झाली. २५% मुले दोन्ही विषयात उत्तीर्ण झाली. तर इंग्रजीत उत्तीर्ण झालेल्या मुलांच गणितात उत्तीर्ण झालेल्या मुलांशी प्रमाण कसे आहे ?

१) १ : १ २) २ : ३ ३) ५ : ७ ४) १० : ९

---

१४. A, B, C, D, E व F या सहा मुलांमधून आणि P, Q, R, S व T या पाच मुलीमधून एक सहा जणांचा संघ निवडायचा आहे त्यासाठी खालील अटी आहेत

१) A व D एकत्र असणे आवश्यक आहे
२) C व S बरोबर असू शकत नाही
३) S व T एकत्र असणे आवश्यक आहे
४) B व E एका संघात असू शकत नाही
५) D व P सोबत असू शकत नाही
६) B व R एकत्र असणे आवश्यक आहे
७) C व Q एकत्र असणे आवश्यक आहेत

ज्र संघामध्ये पाचही मुले आहेत, तर संघाची एकमेव मुलगी सदस्य आहे

१) P २) Q ३) R ४) S

---

१५. सहा व्यक्ती A, B, C, D, E व F हे दोन रागेत बसले आहेत प्रत्येक रांगेत तीन व्यक्ती आहेत

E हा कोणत्याही रांगेच्या शेवटी नाही

D व F पासून डाव्या बाजूस दुसऱ्या जागी आहे

C व E चा शेजारी आहे. तो D च्या तिरपा उलटा बसला आहे

B व F चा शेजारी आहे

खालीलपैकी कोण एकमेकांच्या तिरपे विपरित बसले आहेत ?

१) F आणि C २) D आणि A ३) A आणि C ४) A आणि F

---

१६. विधान वाचून योग्य कोणते ते ठरवा.

अ) भारताचे नागरिकत्व मिळवण्याचे एकूण पाच प्रकार भारतीय राज्यघटनेत दिले आहे

ब) भारतीय नागरिकाचे नागरिकत्व संपुष्टात येण्याचे नागरिकत्व कायदा १९५५ मध्ये एकूण तीन प्रकार दिलेले आहेत

१) फक्त ब २) फक्त अ ३) दोन्ही नाही ४) वरील सर्व

---

१७. जेव्हा लोकसभा अविश्वासाचा ठराव मंत्रीमंडळाविरुध्द पास करते तेव्हा.....

१) फक्त लोकसभेतील निवडून आलेल्या मंत्र्यांना राजीनामा दयावा लागतो

२) फक्त राज्यसभेतील निवडून आलेल्या मंत्र्यांना राजीनामा दयावा लागतो.

३) संपूर्ण मंत्रीमंडळाला राजीनामा द्यावा लागतो

४) १ व २ **मिळून**

---

१८. सरपंचाची निवड जनतेतून करावी अशी शिफारस कोणत्या समितीने केली होती ?

१) वसंतराव नाई समिती २) पी.बी.पाटील समिती ३) अशोक मेहता समिती ४) बलवंतराय मेहता समिती

---

१९. नियंत्रक व महालेखापरिक्षक या संदर्भात असलेला राज्यघनेचा भाग व कलम कोणते ?

१) भाग ५, कलम १५८ २) भाग ५, कलम १४८ ३) भाग ६, कलम १५८ ४) भाग ६, कलम १४८

---

२०. मतदार संख्येचा विचार करता भारतातील लोकसभेचा सर्वात मोठा मतदार संघ कोणता ?

१) लडाख २) मलकाजगिरी ३) लक्ष्यव्दीप ४) चांदणी चौक

---

२१. खालीलपैकी कोणत्या देशात एकेरी नागरिकत्व आहे ?

अ) कॅनडा ब) अमेरिका क) स्वित्झर्लंड ड) ऑस्ट्रेलिया

१) ड २) ब ३) अ ४) क

---

२२. खालीलपैकी कोणत्या बाबीची व्याख्या राज्यघटनेमध्ये करण्यात आलेली नाही ?

अ) अस्पृश्यता ब) अल्पसंख्याक क) घटनेचा भंग

१) अ, ब आणि क २) अ आणि ब ३) ब आणि क ४) क आणि अ

---

२३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते भारताचे वर्णन 'संघराज्य' न करता 'राज्यांचा संघ' असे करण्यात आले आहे कारण की,

अ) भारताची निर्मिती अमेरिकन संघराज्याप्रमाणे झालेली नाही

ब) भारतातील कोणत्याही राज्याला बाहेर पडण्याचा अधिकार नाही

पर्यायी उत्तरे

१) फक्त अ योग्य २) फक्त ब योग्य ३) दोन्ही विधाने योग्य ४) दोन्ही अयोग्य

---

२४. अयोग्य विधान ओळखा

अ) राज्यघटनेतील कलम २३ मानवी व्यापार तसेच बांधील रोजगारीस प्रतिबंध करते

ब) समुदाय सेवा (Community service) कलम २३ चे उल्लंघन करते

१) फक्त ब २) फक्त अ ३) दोन्ही विधाने अयोग्य ४) यापैकी नाही

---

www.spandancareers.org

२५. भारतीय घटनेतील कोणत्या बाबी अमेरिकन राज्यघटनेतून घेतल्या आहेत ?
अ) एकेरी नागरिकत्व ब) राज्यपालाचे पद क) न्यायिक पुनर्विलोकन ड) समवर्ती सूची
१) फक्त क २) फक्त ड ३) फक्त ब ४) फक्त अ

२६. योग्य पर्याय निवडा
अ) 'जल' हा विषय केंद्र सुचीमध्ये समाविष्ट आहे
ब) 'आंतरराज्यीय जल' हा विषय राज्य सुचीमध्ये समाविष्ट आहे
१) विधान अ अयोग्य, ब योग्य २) विधान ब अयोग्य, अ योग्य
३) दोन्ही विधाने योग्य ४) दोन्ही विधाने अयोग्य

२७. एखादा संसद सदस्य पक्षांतराच्या कारणावरुन कोणत्या परिस्थितीत अपात्र ठरु शकतो ?
अ) अपक्ष म्हणून निवडून आलेल्या सदस्याने एखाद्या राजकीय पक्षात प्रवेश केल्यास
ब) नामनिर्देशित सदस्याने पदग्रहण केल्याच्या तारखेपासून सहा महिने संपल्यानंतर एखाद्या राजकीय पक्षात प्रवेश केल्यास
क) ज्या राजकीय पक्षाच्या तिकीटावर निवडून आला आहे त्या पक्षाचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडून दिल्यास
१) फक्त अ २) अ आणि ब ३) ब आणि क ४) अ, ब, क

२८. केंद्रीय लोकसेवा आयोगाबाबत अयोग्य विधान/विधाने निवडा
अ) भारतीय संविधानामध्ये आयोगाच्या सदस्यापदाच्या पात्रतेबाबत कोणतीही तरतूद नाही
ब) आयोगाच्या अध्यक्षाचा कार्यकाल कमाल ६ वर्षे किंवा वयाची ६५ वर्षे पूर्ण होईपर्यंत इतका असतो
क) अध्यक्षाला पदावरुन काढण्याची पध्दत भारताच्या सरन्यायाधीशाला पदावरुन दूर करण्याच्या पध्दतीसारखीच आहे
ड) आयोगाने केंद्राला दिलेला सल्ला बंधनकारक नसतो
१) अ, ब २) अ, क ३) क, ड ४) ब, क, ड

२९. खालील उपराष्ट्रपतींचा कालानुक्रमे क्रम लावा
अ) कृष्णकांत ब) जी.एस.पाठक क) भैरवसिंह शेखावत ड) व्ही.व्ही.गिरी
१) ड, ब, अ, क २) ड, अ, क, ब ३) ब, ड, अ, क ४) ब, ड, क, अ

३०. रयतवारी पध्दतीचे दोष सांगा
अ) जमीन महसुल वाढवण्याचा अधिकार सरकारकडे असल्याने एकाधिकारशाही निर्माण होण्याची शक्यता होती
ब) शेतकऱ्यांनी महसूल जर वेळेवर भरला नाही तर त्यांची जमीन जप्त होत असे
१) अ बरोबर २) ब बरोबर ३) दोन्ही चूक ४) दोन्ही बरोबर

३१. बालहत्या प्रतिबंधासाठी केलेल्या कायद्यांशी संबंधित वर्षे कोणती ?
अ) १७९५ ब) १८०४ क) १८७०
१) फक्त अ २) वरील सर्व ३) फक्त अ व ब ४) फक्त अ व क

३२. सुरक्षा झडप या काँग्रेसच्या स्थापनेसंदर्भातील सिध्दांताबाबत खालील वाक्य विचारात घ्या
अ) सुरक्षा झडपेचा प्रथम उच्चार / उल्लेख लाला लाजपतराय यांनी त्यांच्या यंग इंडिया या पुस्तकात केला
ब) हे पुस्तक त्यांनी १९६१ मध्ये लिहिले
क) त्यांच्या मते काँग्रेसची स्थापना करण्याची कल्पना रिपनच्या डोक्यातून आली
१) ब व क योग्य २) अ व क योग्य ३) अ व ब योग्य ४) सर्व अयोग्य

३३. क्रांतीकारी चळवळींना पाठिंबा देणारी व त्यांचा पुरस्कार करणारे / करणारी वृत्तपत्र कोणते ?
१) संध्या २) काळ ३) युगांतर ४) वरील सर्व

३४. नेहरु समिती (१९२८) बद्दल खालील विधाने पहा
अ) भारतमंत्री बर्कनहेड यांच्या आव्हानास प्रत्युत्तर म्हणून ही समिती स्थापन करण्यात आली
ब) या समितीत एकूण ९ सदस्य (अध्यक्ष व सचिवासह) होते आणि सुभाषचंद्र बोस सचिव होते
क) समितीमध्ये सर्वच्या सर्व हिंदू होते
१) अ बरोबर २) सर्व योग्य ३) अ व ब बरोबर ४) अ व क बरोबर

३५. अ) लंडन इंडियन सोसायटीची (London Indian Society) स्थापना १८६५ मध्ये दादाभाई नौरोजींनी केली
ब) या संस्थेचे सचिव व्योमेशचंद्र बॅनर्जी हे होते
१) दोन्ही बरोबर २) अ अयोग्य ३) ब अयोग्य ४) दोन्ही चूक

३६. योग्य जोडया जुळवा

| वृत्तपत्र | संबंधित व्यक्ती |
|---|---|
| अ) अरुणोदय | i) कृष्णाजी रानडे |
| ब) नेटिव्ह ओपिनियम | ii) विश्वनाथ नारायण मंडलिक |
| क) ज्ञानप्रकाश | iii) कृष्णशास्त्री चिपळूणकर |
| ड) विचार लहरी | iv) काशीनाथ विष्णू फडके |

www.spandancareers.org

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iv | ii | iii | i |
| २) | iv | ii | i | iii |
| ३) | i | ii | iii | iv |
| ४) | iv | iii | ii | i |

३७. खालील वर्णन कोणाविषयी आहे ?
अ) महाराष्ट्राचा रॉबिनहूड ब) क्रांतीकारकांचा जनक
क) 'आनंदमठ'चे स्फुर्तीदाते ड) दुसरा शिवाजी
१) वासुदेव बळवंत फडके २) उमाजी नाईक ३) कजारसिंह नाईक ४) यापैकी नाही

३८. कोणाच्या कारकीर्दीत हंटर कमिशनची नेमणूक करण्यात आली होती ?
१) लॉर्ड बेटिंग २) लॉर्ड कॅनिंग ३) लॉर्ड डलहौसी ४) लॉर्ड रिपन

३९. स्तंभ अ स्तंभ ब

| पत्रक | संपादक |
|---|---|
| अ) नवयुग | i ) गुलाम हुसेन |
| ब) सोशलिस्ट | ii ) मुजफ्फर अहमद |
| क) इन्कलाब | iii ) श्रीपाद अमृत डांगे |

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ii | iii | i |
| २) | iii | ii | i |
| ३) | ii | i | iii |
| ४) | I | iii | ii |

४०. वासुदेव बळवंत फडके यांनी पढील संस्था स्थापन केल्या आहेत ?
अ) पुणे नेटिव्ह इन्स्टिटयुशन ब) ऐक्यवर्धिनी संस्था
१) दोन्ही २) फक्त ब ३) फक्त अ ४) दोन्ही नाही

४१. प्लेग कमिशन रँडच्या हत्येच्या कटाची माहिती द्रविड बंधूनी इंग्रज सरकारला दिली होती, द्रविड खालीलपैकी कोणी ठार केले ?
अ) दामोदर चाफेकर ब) बाळकृष्ण चाफेकर क) वासुदेव चाफेकर ड) महादेव रानडे
१) अ व ब २) ब व क ३) ब व ड ४) ड व क

४२. खालील विधानांपैकी अयोग्य विधान ओळखा
अ) बंगाल नियंत्रण मिळविल्यावर इंग्रजांनी १७५६ साली मीर कासीम यास नबाबपदी नेमले
ब) १७६० साली मीर कासीम यास पदावरुन काढून मीर जाफर यास पदावर बसविले
१) फक्त अ २) फक्त ब ३) अ व ब दोन्ही ४) अ व ब दोन्ही नाही

४३. खालीलपैकी कोणी बक्सारच्या लढाईमध्ये इंग्रज फौजेचे नेतृत्व केले होते ?
१) रॉबर्ट क्लाईव्ह २) मेजर मन्रो ३) डूप्ले ४) यापैकी नाही

४४. आसाम मधील बराक व्हॅली कशासाठी प्रसिध्द आहे ?
१) पेट्रोलियम उत्पादन २) बांबू उत्पादन ३) चहा उत्पादन ४) ताग उत्पादन

४५. विषुववृत्तावर राहणऱ्या जमाती ओळखा
अ) पिग्मी ब) बोरो इंडियन क) सेगाँग ड) झुलू इ) हौसा
१) अ, ब, क २) अ, ब, क, ड ३) वरील सर्व ४) ड, इ

४६. बाडौली सिरोह हा मान्सूनपुर्व **पाऊस** कोणत्या राज्यात पडतो ?
१) अरुणाचल प्रदेश २) बिहार ३) पश्चिम बंगाल ४) आसाम

४७. बराईट हे खनिज कोणत्या खडकात आढळते ?
१) जलजन्य खडक २) रुपांतरीत खडक ३) गाळाचे खडक ४) अग्निजन्य खडक

४८. अ) पृथ्वीवरील बहुतेक उष्ण वाळवंटे २५ ते ३५ अंश या अक्षवृत्तांदरम्यान आढळतात
ब) २५ ते ३५ अंश या अक्षवृत्तांदरम्यान कमी दाबाचे पट्टे आढळून येतात
१) दोन्ही विधाने योग्य आणि ब हे अ चे योग्य स्पष्टीकरण
२) दोन्ही विधाने योग्य आणि अ हे ब चे योग्य स्पष्टीकरण
३) विधान अ योग्य, ब अयोग्य
४) विधान ब योग्य, अ अयोग्य

४९. मध्यप्रदेशातील पाण्याचा निचरा होणाऱ्या मृदेत ............. या पिकाचे उत्पादन होते (रिकामी जागा भरा)
१) ज्वारी २) बटाटा ३) तांदूळ ४) यापैकी नाही

www.spandancareers.org

५०. नदीच्या संचयन कार्यामुळे खालीलपैकी कोणती भुरुपे तयार होतात ?
अ) पंखाकृती मैदाने ब) घळई क) धबधबा
१) फक्त अ २) अ आणि ब ३) अ, ब आणि क ४) यापैकी नाही

५१. मुंबई महानगर क्षेत्रामध्ये
अ) नऊ महानगरपालिकांचा समावेश आहे ब) आठ नगरपरिषदांचा समावेश होतो
क) सुमारे एक हजार गावांचा समावेश होतो
१) विधान अ योग्य २) विधान ब योग्य ३) विधान क योग्य ४) विधाने अ, ब, क योग्य

५२. एखाद्या देशाची सागरी सीमा किती किलोमीटर्सपर्यंत पर्यंत असते ?
१) १२ नॉटिकल मैल २) २१.६ किमी ३) १ व २ ४) यापैकी नाही

५३. लघुग्रह (asteroids) खालीलपैकी कोणत्या दोन ग्रहादरम्यान आढळतात ?
अ) पृथ्वी ब) मंगळ क) गुरु ड) शनी
१) अ आणि ब २) ब आणि क ३) क आणि ड ४) यापैकी नाही

५४. खालील विधानांपैकी योग्य विधान/ विधाने ओळखा
अ) कोरिओलिस बल अक्षांशाला समानुपाती असते ब) विषुववृत्तावर कोरिओलिस बल सर्वाधिक असते
क) ध्रुवावर कोरिओलिस बल सर्वात कमी असते
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) वरीलपैकी सर्व

५५. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही ?
१) उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात गाळाची जाडी पश्चिमेकडून पूर्वेकडे जाताना वाढत जाते
२) भारतीय पठार हा भारतातील सर्वात मोठा नैसर्गिक प्रदेश आहे
३) विच्छेदित भूभाग, प्रस्तरभंग झालेल्या संरचना, दंतूर किनारपट्टी, घळया ही पूर्वकिनारपट्टीची वैशिष्टे आहेत
४) लक्षव्दीप बेट समुह हा भारतातील सर्वात लहान केंद्रशासित प्रदेश आहे

५६. अयोग्य जोडी ओळखा

| थंड हवेच ठिकाण | जिल्हा |
|---|---|
| अ) म्हैसमाळ | – जालना |
| ब) गारमाथा | – बीड |
| क) अंबाझरी | – जालना |
| ड) माथेरान | – रायगड |

१) अ, क, ब २) ब, क, ड ३) अ, क, ड ४) अ, ब, क, ड

५७. योग्य जोडया जुळवा
अ) मोहो विलगता i) आंतरप्रावरण व बाह्य गाभा यादरम्यान
ब) गटेनबर्ग **विलगता** ii) बाह्य प्रावरण व आंतरप्रावरण यादरम्यान
क) रेपेट्टी विलगता iii) बाहय भागा व अंतर्गाभा यादरम्यान
ड) लेहमन विलगता iv) दुर्बलावरण व बाह्य प्रावरण यादरम्यान

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iii | ii | i | iv |
| २) | i | ii | iv | iii |
| ३) | iv | i | ii | iii |
| ४) | ii | iv | i | iii |

५८. संगम योजनेविषयी अयोग्य विधान/विधाने ओळखा
अ) सुरुवात : १५ ऑगस्ट १९९६ ब) उद्देश : अपंगाचे वित्तीय समावेशन
क) कार्य : अपंगाचे स्वयंसहायता गट स्थापन करणे
१) फक्त अ २) फक्त ब ३) फक्त क ४) यापैकी नाही

५९.

| सिध्दान्त | वर्ष |
|---|---|
| अ) निव्वळ खर्च सिध्दांत | i) १९४१ |
| ब) तुलनात्मक खर्च सिध्दांत | ii) १९३३ |
| क) हेक्टर–ओहलीन सिध्दांत | iii) १८१७ |
| ड) स्ऑपलर–सॅम्युल्सन सिध्दांत | iv) १७७६ |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iv | iii | i | ii |
| २) | iv | iii | ii | i |
| ३) | i | ii | iii | iv |
| ४) | ii | iv | I | iii |

www.spandancareers.org

६०. महाराष्ट्र राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरण – २०१५ नुसार २०२० पर्यंत किती गुंतवणूक अपेक्षित आहे ?
१) रु. २५००० कोटी २) रु. ५०००० कोटी
३) रु. १००००० कोटी ४) रु. २०००००० कोटी

६१. खालील विधाने विचारात घ्या
अ) आर्थिक पायाभूत सुविधांमध्ये वाहतूक, वीज, शाळा इत्यादी बाबींचा समावेश होतो
ब) सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये दवाखाने, **कॉलेज**, संवाद सुविधा यांचा समावेश होतो
१) दोन्ही विधाने योग्य २) दोन्ही विधाने अयोग्य
३) विधान अ योग्य, विधान ब अयोग्य ४) विधान ब योग्य, विधान अ अयोग्य

६२. खालील विधाने विचारात घ्या
अ) भारत साखर उत्पादनात जगात पहिल्या क्रमांकावर आहे
ब) जगाच्या एकूण उत्पादनापैकी सुमारे २२% उत्पादन फक्त भारतात होते
१) विधान अ योग्य, विधान ब अयोग्य २) विधान ब योग्य, विधान अ अयोग्य
३) दोन्ही विधाने योग्य ४) दोन्ही विधाने अयोग्य

६३. नवीन लघुउद्योग धोरण कोणत्या दिवशी जाहीर करण्यात आले ?
१) ५ ऑगस्ट १९९१ २) ६ ऑगस्ट १९९१ ३) ७ ऑगस्ट १९९१ ४)८ ऑगस्ट १९९१

६४. भारतमध्ये जर एक दशलक्ष रुपयांची गुंतवणूक केल्यास
अ) उत्पादन क्षेत्रामध्ये ७८ लोकांसाठी रोजगार निमार्ण होतात
ब) पर्यअन क्षेत्रामध्ये ४५ लोकांसाठी रोजगार निर्माण होतात
वरील विधानांपैकी योग्य विधान/विधाने ओळखा
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही ४) यापैकी नाही

६५. १९९६ पासून एका वर्षाचा अपवाद वगळता भारताची सेवा क्षेत्रातील वार्षिक वाढ ही जगातील कोणत्याही देशापेक्षा जास्त आहे. खालीलपैकी कोणत्या वर्षात भारताची सेवा क्षेत्रातील वार्षिक वाढ जगाचा विचार करता सर्वाधिक नव्हती ?
१) २००७ २) २००८ ३) २००९ ४) २०१०

६६. खालीलपैकी कोणत्या देशामध्ये सेवा क्षेत्राचा रोजगारातील वाटा तुलनात्मक दृष्टया कमी आहे ?
अ) भारत ब) चीन
१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही ४) यापैकी नाही

६७. भारतमध्ये आजपर्यंत एकूण सहा वेळा आर्थिक गणना करण्यात आली. खालीलपैकी कोणत्या वर्षी ही गणना करण्यात आली आहे ?
अ) १९७७ ब) १९८० क) १९९०
ड) १९९८ इ) २००५ फ) २०१३
१) अ, ब, क २) ड, इ, फ ३) ब, क, ड ४) वरीलपैकी सर्व

६८. खालीलपैकी कोणत्या उद्योगांचा समावेश मुलभूत गाभा उद्योगांमध्ये होतो ?
अ) कोळसा ब) कच्चे तेल क) नैसर्गिक वाय ड) शुध्द पेट्रोलियम उत्पादने
इ) खते फ) स्टील ग) सिमेंट ह) वीज
१) अ, ब, क, ड २) इ, फ, ग, ड ३) क, ड, इ, फ ४) वरीलपैकी सर्व

६९. एन. एस.विश्वनाथ यांच्या अध्यक्षतेखाली पॅनेल कशाशी संबंधित आहे ?
१) पेगाससद्वारे अनिधिकृत पाळत २) प्रधानमंत्री फसल विमा योजना (PMFBY)
३) तंबाखू कर धोरण ४) शहरी सहकारी बँकांसाठी चतुस्तरीय रचना

७०. लक्ष्यित सार्वजनिक वितरण व्यवस्था कधी सुरु करण्यात आली ?
१) जून १९९६ २) जून १९९७ ३) जून १९९८ ४) जून १९९९

७१. परकीय प्रत्यक्ष गुंतवणूक प्रतिबंध क्षेत्रांचा समावेश होतो ?
अ) लॉटरी व्यवसाय ब) अणूऊर्जा क) चिट फंडस ड) जुगार व सट्टेबाजी
१) अ, ब, ड २) अ, क, ड ३) अ, ब, क, ड ४) अ, ब, क

७२. रेशीमाच्या एका कोशापासून सुमारे ............... मीटर ते ............... मीटर लांबीचा धागा मिळतो
१) १००,२०० २) ३००,८०० ३) ५००,१३०० ४) १०००,२०००

७३. नुकतेच चर्चेत असणारा “Grand Ethiopian Renaissance Dam” कोणत्या नदीवर आहे ?
१) नाईल २) काँगो ३) झान्बेझी ४) नायजर

७४. अ) सर जेम्स डयुअर हे स्कॉटिश वैज्ञानिक होते
ब) त्यांनी १९९२ मध्ये पहिला थर्मास फ्लास्क तयार केला
१) विधान अ योग्य २) विधान ब योग्य ३) दोन्ही विधाने योग्य ४) दोन्ही विधाने अयोग्य

www.spandancareers.org

७५. जोडया जुळवा

| सागर खनिजसंपत्ती | उपयोग |
|---|---|
| अ) मॅग्नेशिअम | i ) कागद निर्मिती |
| ब) पोटॅशिअम | ii ) खतनिर्मिती |
| क) सोडिअम | iii ) कॅमेऱ्याचा फ्लॅश बल्ब |
| ड) सल्फेट | iv ) कृत्रिम रेशीम |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| १) | iii | ii | i | iv |
| २) | ii | i | iii | iv |
| ३) | i | ii | iv | iii |
| ४) | ii | iv | i | iii |

७६. पुढील विधाने विचारात घ्या

अ) वाळवंटातील झाडांची पाने काटयांच्या स्वरुपात असतात

ब) वाळवंटातील झाडांमध्ये प्रकाशसंश्लेषण खोडांमार्फत होते

वरीलपैकी अयोग्य नसणारे विधान/विधाने ओळखा

१) फक्त अ २) फक्त ब ३) दोन्ही ४) यापैकी नाही

७७. खालील विधाने विचारात घ्या

अ) अवकाशातील तारे प्लाझ्मा या अवस्थेमुळे चमकतात

ब) प्लाझ्मा ही अवस्था उच्च तापमानावर आढळून येते

१) दोन्ही विधाने योग्य २) दोन्ही विधाने अयोग्य

३) फक्त विधान अ योग्य ४) फक्त विधान ब योग्य

७८. पुढील विधाने विचारात घ्या

अ) बाष्पीभवनाचा वेग पृष्ठभागाच्या क्षेत्रफळाशी समानुपाती असतो

ब) बाष्पीभवनाचा वेग वाढत्या तापमानाशी व्यस्तानुपाती असतो

क) बाष्पीभवनाचा वेग वातावरणातील आर्द्रतेशी समानुपाती असतो

ड) बाष्पीभवनाचा वेग वाऱ्याच्या वेगाशी समानुपाती असतो

वरील विधानांपैकी योग्य विधान ओळखा

१) अ, ब, क, ड २) अ आणि ब ३) अ आणि क ४) अ आणि ड

७९. योग्य पर्याय निवडा

अ) मेंडोलिव्हच्या मते अणुअंक हा मूलद्रवाचा मूलभूत गुणधर्म आहे

ब) मोस्लेच्या मते अणुवस्तुमान हा मूलद्रव्याचा मूलभूत गुणधर्म आहे

१) विधान अ योग्य, ब अयोग्य २) विधान ब योग्य, अ अयोग्य

३) दोन्ही विधाने अयोग्य ४) दोन्ही विधाने योग्य

८०. खालीलपैकी दुहेरी संयुजा असणारे मूलद्रव्य कोणते ?

१) क्लोरीन २) फॉस्फरस ३) हायड्रोजन ४) कार्बन

८१. सपाट आरशामुळे मिळणारी प्रतिमा कशी असते ?

अ) आभासी ब) उभी क) वस्तुच्या आकाराएवढी

१) अ आणि ब २) ब आणि क ३) क आणि ड ४) अ, ब आणि क

८२. योग्य जोडया जुळवा

| स्तंभ अ<br>माध्यम | स्तंभ ब<br>ध्वनीचा वेग (मीटर प्रति सेकंद) |
|---|---|
| अ) अल्युमिनिअम | i) १५३१ |
| ब) पाणी | ii) ६४२० |
| क) हायड्रोजन | iii) १२८४ |

| | अ | ब | क |
|---|---|---|---|
| १) | iii | ii | i |
| २) | i | ii | iii |
| ३) | ii | iii | i |
| ४) | ii | i | iii |

८३. गुरुत्व स्थिरकांचे मूल्य काय आहे

१) $6.67 \times 10^{-11}$ $Nm^2/kg^2$ २) $6.67 \times 10^{-10}$ $Nm^2/kg^2$

३) $6.7 \times 10^{-12}$ $Nm^2/kg^2$ ४) $6.7 \times 10^{-13}$ $Nm^2/kg^2$

www.spandancareers.org

८४. एखाद्या ज्योतीमध्ये आपणास पिवळा, पिवळसर, लाल आणि निळा असे विविध भाग दिसून येतात. या भागाचा त्याच्या उष्णतेनुसार उतरता क्रम लावा ?

१) पिवळा – पिवळसर लाल – निळा २) पिवळसर लाल – पिवळा – निळा

३) निळा – पिवळा – पिवळसर लाल ४) निळा – पिवळसर लाल – पिवळा

८५. रेशीम कशापासून बनलेले असते ?

१) प्रथिन २) कर्बोदक ३) स्निग्ध **पदार्थ** ४) यापैकी नाही

८६. UNHRC बाबत योग्य पर्याय निवडा.

अ) या परिषदेने Office of the High Commissioner for Human Rights ची जागा घेतली

ब) भारत सहाव्यांदा या ४७ सदस्यीय परिषदेवर निवडून आला आहे.

१) फक्त अ अचूक २) फक्त ब अचूक

३) दोन्ही अ व ब अचूक ४) दोन्ही अ व ब चूक

८७. अलीकडे चर्चेत असणारे Water Revolution कोणत्या प्रदेशाशी संबंधित आहे ?

१) मॉरिशिस २) सुदान ३) तैवान ४) हाँगकाँग

८८. बांग्लादेशचा 'बांगलादेश मुक्तीयोध्दा सन्मान' खालीलपैकी या भारतीयांना देण्यात आला नाही ?

अ) प्रणव मुखर्जी ब) अटल बिहारी वाजपेयी क) आय.के.गुजराल ड) इंदिरा गांधी इ) नरेंद्र मोदी

१) फक्त क २) फक्त क, इ

३) फक्त ड, इ ४) या सर्वांना हा सन्मान मिळाला आहे

८९. कोणत्या देशाच्या भारताने बांधलेल्या सर्वोच्च न्यायालयाच्या इमारतीचे जुलै २०२० मध्ये पंतप्रधान मोदींनी उदघाटन केले ?

१) मॉरिशिस २) मालदीव ३) भूतान ४) फिजी

९०. १५ ऑगस्ट २०२१ रोजी तालिबानी फौजांनी काबूल ताब्यात घेतले. तालिबानबाबत खालीलपैकी योग्य पर्याय निवडा ?

अ) तालिबान या पश्तून भाषेतील शब्दाचा अर्थ 'योध्दा (Warrior) असा होता

ब) यापूर्वी १९९२ साली पहिल्यांदा तालिबान्यांनी अफगाणिस्तानची सत्ता हस्तगत केली होती

क) फेब्रुवारी २०२० मध्ये युएईतील अबूधाबी येथे अमेरिका–तालिबान शांतता करार झाला होता

पर्याय :

१) फक्त अ चूक २) फक्त अ, क चूक ३) वरील सर्व अचूक ४) वरील सर्व चूक

९१. Yotta NM1 नेमके काय आहे ?

१) अमेझॉनचा घरगुती कामासाठी रोबोट

२) आरबीआयची सहकारी बँकांसाठीच्या नियमनासाठीची प्रणाली

३) नवी मुंबईस्थित जगातील सर्वात मोठे डेटा सेंटर

४) यापैकी नाही

९२. आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्र प्राधिकरण (IFSCA) संबंधी योग्य विधाने दर्शविणारा पर्याय निवडा ?

अ) या प्राधिकरणाचे मुख्यालय मुंबई येथे आहे

ब) या प्राधिकरणात सरकारद्वारे १० सदस्यांची नियुक्ती करण्यात येते

क) आंतरराष्ट्रीय वित्तीय सेवा केंद्रांमधील वित्तीय सेवांचे नियमन करण्यासाठी केंद्र सरकारने या प्राधिकरणाची स्थापना केली आहे

१) फक्त अ व ब २) फक्त ब व क ३) फक्त अ व क ४) फक्त क

९३. जागतिक बँकेच्या ॲटलास पध्दती संबंधी अयोग्य विधाने दर्शविणारा योग्य पर्याय निवडा ?

अ) यानुसार देशांचे दरडोई देशांतर्गत उत्पन्न (per capital GDP) अमेरिकी डॉलरच्या मूल्यामध्ये मोजून त्यांची वर्गवारी करण्यात येते

ब) जुलै २०२० मध्ये प्रसिध्द आकडेवारीनुसार नेपाळ आणि श्रीलंका निम्न–मध्यम (Lower Middle) अर्थव्यवस्था गटात आले आहेत

क) २०२० च्या वर्गवारीनुसार इंडिया उच्च मध्यम (Upper Middle) अर्थव्यवस्थेमध्ये मोडतो

१) फक्त अ व ब २) फक्त ब व क ३) फक्त अ व क ४) अ, ब व क

९४. खालीलपैकी कोणी देशातील पहिला गॅस व्यापार मंच (The Indian Gas Exchange) सुरु केला आहे ?

१) मल्टी कमोडिटी एक्सचेंज ऑफ इंडिया २) इंडियन एनर्जी एक्सचेंज लि

३) बॉम्बे स्टॉक एक्सचेंज ४) वरीलपैकी कोणतेही नाही

९५. खालीलपैकी कोणत्या बदंराचे नाव श्यामा प्रसाद मुखर्जी पोर्ट ट्रस्ट असे ठेवण्यात आले आहे ?

१) जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट (न्हावा शेवा)

२) मुंद्रा बंदर (कच्छ, गुजरात)

३) कांडला बंदर (कांडला, गुजरात)

४) वरीलपैकी कोणतेही नाही

www.spandancareers.org

९६. "हेलीकॉप्टर मनी" (Helicopter Money) संबंधी खालीलपैकी अयोग्य विधाने दर्शवणारा योग्य पर्याय निवडा ?
अ) अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ मिल्टन फ्राईडमन यांनी हा शब्द तयार केला
ब) हेलीकॉप्टर मनी अंतर्गत सरकारला मिळालेल्या पैशाची मध्यवर्ती बँकेस परतफेड करावी लागते
क) मध्यवर्ती बँकेच्या परिमाणात्मक सुलभता (Quantitative easing) या परधोरणाचा हा भाग आहे
१) फक्त अ व ब २) फक्त ब व क ३) फक्त अ व क ४) अ, ब व क

९७. किमान आधारभूत किमती (MSP) बाबतीत खाली दिलेल्या विधानांचा विचार करुन योग्य पर्याय निवडा ?
अ) कृषी खर्च आणि किमती आयोग (CACP) ही किमत ठरवतो
ब) संध्या २४ पिकांसाठी एमएसपी ठरविण्यात येते
क) किमान आधारभूत किमत मोजताना A2 + FL पध्दती वापर करण्यात येते
१) फक्त अ व ब बरोबर २) फक्त अ व ब चूक
३) फक्त अ व क बरोबर ४) फक्त अ व क चूक

९८. केंद्रीय पर्यटन मंत्रालयाने जाहीर केलेल्या भारतीय पर्यटन आकडेवारी २०१९बाबत खालील दिलेल्या विधानानांचा विचार करुन योग्य पर्याय निवडा
अ) देशात येणाऱ्या एकूण पर्यटकांपैकी सर्वाधिक पर्यटक बाग्लादेशमधून येतात
ब) उत्तर प्रदेश हे सर्वाधिक देशांतर्गत पर्यटक आकर्षित करणारे राज्य आहे
क) महाराष्ट्र हे सर्वाधिक परदेशी पर्यटक आकर्षित करणारे राज्य आहे
१) फक्त अ व ब बरोबर २) फक्त ब व क बरोबर
३) फक्त अ व क बरोबर ४) अ, ब व क बरोबर

९९. खालीलपैकी अयोग्य जोडी ओळखा ?
१) भारतातील सर्वात लांब नदीवरील पूल – आसाम
२) जगातील सर्वात उंच पायर (pier) पूल – मणिपूर
३) जगातील सर्वाधिक लांबीचा महामार्ग बोगदा – उत्तराखंड
४) जागतील सर्वात उंचीवरील वाहन चालविण्यायोग्य खिंड रस्ता – लडाख

१००. ग्राहक सरक्षण कायदा २०१९ किती तारखेपासून लागू करण्यात आला ?
१) २० जुलै २०२० २) ९ ऑगस्ट २०१९
३) २० जुलै २०२१ ४) ९ ऑगस्ट २०२०

www.spandancareers.org